# डेलावेअर व्हॅली मराठी मित्र मंडळ

**DVMMM: Delaware Valley Marathi Mitra Mandal**

## हितगुज

वर्ष १, अंक २ ऑक्टोबर ३१ २००२

हितगुजच्या सर्व वाचकांना दिवाळीच्या शुभेच्छा

   

DVMMM
Executive Committee

President
Vanita Kubal
(302) 453-8738

Vice President
Prashant Karandikar
(610) 268-0807

Treasurer
Vinay Pradhan
(302) 239-0542

Secretary
Ashish Chaughule
(302) 235-7295

Cultural Secretary
Pradeep Khaladkar
(302) 239-6204

WebPage/YahooGroups
Sandeep Karode
(302) 478-6789

Karyakarte
Anjou Sathe-Keller
(302) 376-1994
Samarth Joshi
(302) 892-2887
Vinita Deshmukh
(302) 764-6134

http://dvmmm.i8.com

http://groups.yahoo.com/groups/marathimandal

## डेलावेअर व्हॅली मराठी मित्र मंडळाचे भव्य उद्घाटन!



डेलावेअर व्हॅली मराठी मित्र मंडळाची (DVMMM) मुहूर्तमेढ १० ऑगस्ट २००२ रोजी नेवार्क डेलावेअर येथे रोवली गेली. त्यानंतर मंडळाची घटना लिहून ५ कार्य कर्त्यांची समिती स्थापन करण्यात आली. विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर १५ ऑक्टोबर २००२ रोजी मंडळाचा उद्घाटन कार्यक्रम डेलावेअरच्या मंदिरात ६०-७० सभासदांच्या उपस्थितीत साजरा झाला.

सौ. पाची व श्री. विनय प्रधान या नवविवाहित दांपत्याने श्री सत्यनारायणाची पूजा करून शुभकार्याची सुरुवात केली. त्यानंतर सागर, अनुश्का, पाची, शीला, नीता, मिहीर आणि आशीष या बालमंडळींनी श्री सत्यनारायणाच्या कथांचे वाचन केले. सागर, पाची आणि नीता यांनी दसरा सणाबद्दल माहिती सांगितली. यात विशेष लक्षात राहिले ते शुद्ध मराठीत आणि सुस्पष्ट उच्चारात पाची पेंडसेने सांगितलेले विजयादशमीचे महत्त्व.

सभागृहात एव्हाना एक वेगळेच प्रसन्न वातावरण तयार झाले. सनई बासरीचे सूर अत्तराचा सुगंध सौ. शैला वैद्य यांनी वाटलेली सोन्याची पानं आणि सौ. मंजुश्री करंदीकर यांचे पेढे यांनी कार्यक्रमाला एक वेगळेच रूप आणले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. प्रदीप साठे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. डीव्हीएमएमएम च्या बॅनर वरची फीत कापून त्यांनी मंडळाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. मंडळाच्या अध्यक्षा सौ. वनिता कुवळ यांनी मंडळाची कल्पना ते स्थापना ते उद्घाटन या वाटचालीचा आढावा घेतला.

त्यानंतर सुमारे अडीच तासांचा श्री. प्रदीप साठे यांचा सुगम संगीताचा कार्यक्रम झाला. प्रदीप साठे हे गेली काही वर्षे वॉशिंग्टन डी सी परिसरात गायक पेटी वादक आणि संगीत दिग्दर्शक म्हणून प्रसिद्ध आहेत. शास्त्रीय संगीत ते पं. वसंतराव कुलकर्णी यांच्याकडे तर सुगम संगीत प्रसिद्ध संगीतकार आणि गीतकार श्री. यशवंत देव यांच्याकडे शिकले. कार्यक्रम अप्रतिम झाला. गणेश वंदनेने सुरुवात करून नाट्यगीतं भावगीतं आणि लोकगीतं अशी विविध स्वरसुमांची मैफिल प्रदीपनी रसिकांपुढे साजरी केली. त्यांच्या साथीला तबल्यावर होते श्री. संजय कुलकर्णी जे गेली २० वर्षं तबला वाजवत आहेत कुठल्याही गुरूकडून शिक्षण न घेता. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन केलं होतं श्री. मयूर देवल यांनी जे स्वत: एक कवी आहेत. त्यांचीच एक रचना जी प्रदीप साठे यांनी स्वरबद्ध केली ती तर झकासच होती. कार्यक्रमाची सांगता "अशी पाखरे येती" या कवी मंगेश पाडगांवकर यांच्या लोकप्रिय गीताने झाली.

उपाध्यक्ष श्री. प्रशांत करंदीकर यांनी केलेल्या आभार प्रदर्शनानंतर होता कार्यक्रमाचा सर्वात आवडता नेहमीचा हवाहवासा वाटणारा भाग - उपहार. पावभाजी आहाहा! शीरा क्या बात है! महिला आघाडीचा विजय असो!

दसरा आला आणि आपणा सर्वांना मराठी सुगंधात आणि मराठमोळ्या स्वरसुमांत न्हाऊन गेला. दसरा सण मोठा नाही आनंदा तोटा!

- समर्थ जोशी

सभागृहात एव्हाना एक वेगळेच प्रसन्न वातावरण तयार झाले. सनई बासरीचे सूर अत्तराचा सुगंध सौ. शैला वैद्य यांनी वाटलेली सोन्याची पानं आणि सौ. मंजुश्री करंदीकर यांचे पेढे यांनी कार्यक्रमाला एक वेगळेच रूप आणले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. प्रदीप साठे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. डीव्हीएमएमएम च्या बॅनर वरची फीत कापून त्यांनी मंडळाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. मंडळाच्या अध्यक्षा सौ. वनिता कुवळ यांनी मंडळाची कल्पना ते स्थापना ते उद्घाटन या वाटचालीचा आढावा घेतला.

त्यानंतर सुमारे अडीच तासांचा श्री. प्रदीप साठे यांचा सुगम संगीताचा कार्यक्रम झाला. प्रदीप साठे हे गेली काही वर्षे वॉशिंग्टन डी सी परिसरात गायक पेटी वादक आणि संगीत दिग्दर्शक म्हणून प्रसिद्ध आहेत. शास्त्रीय संगीत ते पं. वसंतराव कुलकर्णी यांच्याकडे तर सुगम संगीत प्रसिद्ध संगीतकार आणि गीतकार श्री. यशवंत देव यांच्याकडे शिकले. कार्यक्रम अप्रतिम झाला. गणेश वंदनेने सुरुवात करून नाट्यगीतं भावगीतं आणि लोकगीतं अशी विविध स्वरसुमांची मैफिल प्रदीपनी रसिकांपुढे साजरी केली. त्यांच्या साथीला तबल्यावर होते श्री. संजय कुलकर्णी जे गेली २० वर्षं तबला वाजवत आहेत कुठल्याही गुरूकडून शिक्षण न घेता. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन केलं होतं श्री. मयूर देवल यांनी जे स्वत: एक कवी आहेत. त्यांचीच एक रचना जी प्रदीप साठे यांनी स्वरबद्ध केली ती तर झकासच होती. कार्यक्रमाची सांगता "अशी पाखरे येती" या कवी मंगेश पाडगांवकर यांच्या लोकप्रिय गीताने झाली.

उपाध्यक्ष श्री. प्रशांत करंदीकर यांनी केलेल्या आभार प्रदर्शनानंतर होता कार्यक्रमाचा सर्वात आवडता नेहमीचा हवाहवासा वाटणारा भाग - उपहार. पावभाजी आहाहा! शीरा क्या बात है! महिला आघाडीचा विजय असो!

दसरा आला आणि आपणा सर्वांना मराठी सुगंधात आणि मराठमोळ्या स्वरसुमांत न्हाऊन गेला. दसरा सण मोठा नाही आनंदा तोटा!

- समर्थ जोशी

**चाहूल दिवाळीची**

दिवाळीची लागे चाहूल
स्वच्छ करू अपुले घरकुल || १ ||

फराळ करू एकगोटी
जनमन होईल आनंदी || २ ||

शाळांना लागेल सुट्टी
अभ्यासाला मिळेल बुट्टी || ३ ||

नव वस्त्रांची खरेदी मोठी
खाण्याचीही यादी मोठी || ४ ||

मिष्टान्नाचे जमा दरवळी
फटाक्यांची होईल सरबत्ती || ५ ||

भेटकार्डे पत्रपेटीत पडती
लोकांमधून दागिने मिरवती || ६ ||

घर फुलांचे कंदिल चमकती
रांगोळ्या, उटणी चिकणा येती || ७ ||

पणतीच्या तेवतील वाती
चार दिवस दिवाळीच्या राती || ८ ||

सौ. विभा रमेश फडके (६, ऑक्टोबर २००४)

माझा लाडका सण

कधी वाटते आपण का आहोत मराठी
एक सोप्पं उत्तर आहे, आपल्या सर्व सणांसाठी
आपला स्वभाव मराठमोळा
सांगतो तुम्हाला त्या सर्व सणांचा सोहळा
हे उत्सव साजरे करण्यात का सांगा आपण **आघाडी?**
**कारण आपल्या सणांचा मोठा** भाग म्हणजे खादाडी
प्रथम महिना म्हणजे चैत्र
हा म्हणजे आमचा एकदम मैत्र
कारण पहिलाच दिवस असतो पाडव्याचा
दारोदारी रंगीबेरंगी गुढ्यांचा
या गुढीच्या पूजेबद्दल लहानपणापासूनच होत्या शंका
पण आमचे मास्तर ओरडायचे जास्त प्रश्न विचारू नका
मग पुन्हा म्हणायचे खादाडीचे कडवे
आणि भरपूर श्रीखंड खाऊन जायचे आडवे
त्यानंतर लगेच येतो अक्षयतृतीयेचा महिना वैशाख
साडेतीन मुहूर्तांचा मान म्हणून आम्हाला मिळायचा नवा पोशाख
आषाढी कार्तिकी म्हणजे आली एकादशी
उपास म्हटले की डोळ्यासमोर येते साबुदाणा खिचडीची बशी
श्रावणात येऊन जाईल पावसाची हलकीशी सर
पण श्रावणी सोमवार या शुक्रवारचा पडणार नाही कधीच विसर
तोंडात आमच्या चणे फुटाण्याचा गर्दा
आणि शाळा पण फक्त दिवस अर्धा
आधी नागपंचमी नंतर येते राखी पौर्णिमा
या दिवशी तर सर्व बहिण भावंडांचा हंगामा
फक्त रस्त्यातून फिरताना दिसली एखादी सखी
तर जरा लांबच रहा नाहीतर बांधायची तुम्हाला राखी
पोळा साजरा करायला आम्ही ना पाहिला बैल ना घोडा
पण तरी लोकलमध्ये टीसीला म्हणणार आजच्या दिवस सोडा
ऑक्टोबरातला आमचा आनंद म्हणजे दसरा
मग होतो आमचा चेहरा एकदम हसरा
देऊन लोकांना खूप सोने
अगदी प्रसन्न होतात आमची मने
कोजागिरीला गच्चीवर एक फक्कड चव असते दुधाला
कारण त्यात असतो एव्हरेस्टचा बदामी मसाला
दिवाळीची मजा तर काय सांगू तुम्हाला
फक्त मुकू नका कधी त्या फराळाला
संपत आले वर्ष आली संक्रांत मकर
तिळाचे लाडू आणि हलव्या खाण्यात ठेऊ नका कसर
मग धमाधम करत येते होळी
पानात मात्र पाहिजे पुरणाची पोळी
नेहमीच वाट पाहतो हे सण येतात कधी
पण माझा सगळ्यात लाडका सण म्हणजे गणपती
मोदक आणि प्रसाद खाण्यात पोटोबा होतात धन्य
आरत्या म्हणताना होते मन एकदम प्रसन्न
बाकीचे सण येतात आणि जातात
पण गणपतीबाप्पा मात्र आम्हाला रडवून जातात
देवा ऐका आमचे गाऱ्हाणे
आहे आता एकच मागणे
पुढच्या वर्षी लौकर या
गणपतीबाप्पा मोरया

– सौरभ पालकर (spalkar@hotmail.com)

हरवलेले मन

कधी कधी असा कसा
माझ्यातला मी हरवून असतो
कोण मी काय मी
कशाचा कशाला पत्ता नसतो || १ ||
वाट मात्र ओळखीची वाटते
खाणाखुणा पटत असतात
वाटेवरचा हिरवा वृक्ष
हिरवा कंदील वाटत असतो || २ ||
मन मात्र थाऱ्यावर नसते
मन मात्र थाऱ्यावर नसते
मनाशिवायच स्मृतिसंवेदना
हृदयात ठणकत असतात || ३ ||
हलकेच कधी पिसासारखे
हरवलेले मन परत येते
त्याला विचारून सारे प्रश्न
मी पण परत येते || ४ ||

प्रशांत कळंकीकर